# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
## जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१

Website:www.jdnagpur.in Email: jdhengp@rediffmail.com

Phone No.0712- 2561713 Fax No.0712- 2554210


क्रं.उशिनाग/केंद्र पुरस्कृत /शिष्यवृत्ती/ दिव्यांगजन/५६६९ /२०२० दिनांक १४/१२/२०२०

प्रति,

१. कुलसचिव,रा.तु.म, नागपूर विद्यापीठ, नागपूर
२. कुलसचिव,कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक
३. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. कुलसचिव, विधी विद्यापीठ, नागपूर
५. सहसंचालक, तंत्रशिक्षण, सदर, नागपूर
६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सिव्हील लाईन, नागपूर
७. उपसंचालक, शालेय शिक्षण, विभाग, नागपूर
८. संचालक, शासकीय/सर्व प्राचार्य अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालये/संस्था नागपूर विभाग, नागपूर

**विषय :- केंद्र शासनाच्या समाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२०-२१ च्या अंमलबजावणीबाबत.**

**संदर्भ :- १) संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं-२०२०-२१/केंद्र पुरस्कृत /शिष्यवृत्ती/दिव्यांगजन /८३७२, दिनांक १०.१२.२०२०**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या समामजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उद्देशाने दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२०-२१ साठी राज्यामध्ये ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal) करण्यासाठी www.scholarship.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर संकेतस्थळावर विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक ३१.१२.२०२० आहे. सदर शिष्यवृत्तीची रक्कम ही विकलांगजन सशक्तीकरण विभाग नवी दिल्ली यांचेमार्फत विद्यार्थ्यांचे बँक खातेवर थेट DBT अंतर्गत जमा करण्यात येते.

सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी १८७९ संच निधारित केलेले आहेत. सदर शिष्यवृत्ती ११ वी, १२ वी, पोस्ट मॅट्रिक डिप्लोमा/सर्टिफिकेट, पदवी, पदव्युत्तर डीग्री/डिप्लोमा तसेच डिप्लोमा व सर्टिफिकेट या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी इयत्ता १० वी व १२ वी ची परीक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून तसेच पदवी व पदव्युत्तर परीक्षा मान्यताप्राप्त विद्यापीठातुन दिलेला विद्यार्थी अर्ज भरण्यासाठी पात्र असेल.


सहसंचालक तंत्रशिक्षण
नागपूर
6093
15 DEC 2020

केंद्रशासनाकडून सदर शिष्यवृत्तीसाठी नवीन मंजूरीसाठी (Fresh) व नूतनीकरणाचा (Renewal) विद्यार्थ्यांनी अर्जाची ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१.१२.२०२० अशी निर्धारित करण्यात आलेली आहे. तसेच महाविद्यालये/ संस्था यांना अर्जाची छाननी करून Forward करण्याचा अंतिम दि. १५.१.२०२१ आहे.

महाविद्यालय/ संस्थेत शिक्षण घेणाऱ्या सर्व पात्र दिव्यांगजन विद्यार्थ्यांना नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नूतनीकरणासाठीचे (Renewal) ऑनलाईन अर्ज www.scholarship.gov.in या संकेत स्थळावर देण्यात आलेल्या User Manual/ Guideline व FAQ चा वापर करून ३१.१२.२०२० पूर्वी भरण्याबाबतचा सुचना देण्यात याव्या तसेच सदर माहीती संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

महाविद्यालय/ विद्यापीठाच्या प्रमुखांनी त्यांच्या महाविद्यालयातील/ विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जात नमूद केलेला त्यांचा आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी लिंक केलेला असल्याची खात्री करावी. आधार क्रमांक बँक खात्याशी लिंक केलेला नसेल तर तशा सूचना संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज भरतांना त्यांचा आधार क्रमांक त्यांच्या ज्या बँक खात्याशी लिंक केलेला आहे त्याच बँक खात्याचा क्रमांक अर्जात नमुद करावा अशा सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती सन २०२०-२१ ही राज्यात यशस्वीपणे राबविण्यासाठी शिष्यवृत्तीबाबतचे सूचना महाविद्यालयाच्या फलकावर लावण्याबाबत आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व महाविद्यालय/संस्था यांना देण्यात याव्यात.

तसेच सर्व महाविद्यालये/ संस्थांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर इंन्स्टीट्युट प्रोफाईल अद्ययावत न केल्यास महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या अर्जावर पुढील कार्यवाही करू शकणार नाही. तरी आपले महाविद्यालय/विद्यापीठाचे प्रोफाईल अद्ययावत करण्यात यावे. अर्ज संस्थेच्या लॉगीनमध्ये प्रलंबीत राहील्यास होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालये/ संस्था प्रमुखांची राहील.

(डॉ. महेशकुमार साळुंखे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/दिव्यांगजन/2020/ 3034
दिनांक :- 16 DEC 2020

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय तंत्रनिकेतन, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था, नागपूर विभाग,
नागपूर .

आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष 2020-21 साठी केंद्र शासनाच्यावतीने **दिव्यांगजन विद्यार्थ्यासाठी** पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्ती योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी वरील पत्रात नमुद केल्याप्रमाणे सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यांत यावी.

(डॉ. राम निबुदे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.